Founder



Karmaveer Bhausaheb Hiray

Mahatma Gandhi Vidyamandir's

**ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE, MANMAD**

Re-Accredited by NAAC with 'A' Grade

Affiliated to Savitribai Phule Pune University (ID No. PU/NS/ASC/011 (1969)

# Metric No. 5.1.1

## 5.1.1 POLICY DOCUMENT FOR AWARD SCHOLARSHIP

MAHATMA GANDHI VIDYAMANDIR'S

# ARTS, SCIENCE AND COMMERCE COLLEGE MANMAD

TAL- NANDGAON, DIST- NASHIK, MAHARASHTRA, PIN- 423104

RE-ACCREDITED BY NAAC WITH 'A' GRADE

AFFILIATED TO SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY, ID NO. PU/NS/ASC/011 (1969)

## Policy Document

## Award of Scholarship/Free ship

### Scope:

The scope of this policy includes the procedure for extending support in the award of scholarships/free ship to needy students.

### Objectives:

- To disseminate information about various schemes of financial support to students.
- To encourage needy students to avail the opportunity of higher education which otherwise is interrupted due to financial conditions.
- To extend support to such students to get benefits of various government and non-government schemes of financial support.
- To determine the guidelines for offering concession in admission fees to needy students.
- To sensitize the students on our policy of non-discrimination irrespective of their financial condition.
- To have a simplified mechanism for students to get financial support.

### Policy:

The college shall extend all the possible support to the needy students to receive information about government, non-government, and individual support schemes, timely submission of applications through online/offline portals, regular follow-up of the process, and timely disbursement of the amount to the students.

Mahatma Gandhi Vidyamandir's Arts, Science and Commerce College, Manmad

CO - ORDINATOR
INTERNAL QUALITY ASSURANCE CELL
M.G.V.'s Arts, Science & Commerce College
Manmad, Dist. Nashik

PRINCIPAL
MGV Arts, Science & Commerce College
MANMAD, Dist. Nashik

Founder



Karmaveer Bhausaheb Hiray

Mahatma Gandhi Vidyamandir's

**ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE, MANMAD**

Re-Accredited by NAAC with 'A' Grade

Affiliated to Savitribai Phule Pune University (ID No. PU/NS/ASC/011 (1969)

**GOVERNMENT POLICY DOCUMENT FOR ENTITLEMENT OF SCHOLARSHIP PURSUING HIGHER EDUCTION**

(English version – separate govt. resolution is attached with it in local language)

Government scholarships for students are programs established by government bodies to provide financial support and assistance to eligible students pursuing education at various levels. These scholarships aim to promote education, improve access to quality education, and support deserving students who may face financial constraints.

**Eligibility** criteria may include factors like academic performance, income level of the student's family, specific demographic considerations, and sometimes, specialized criteria (e.g., minority scholarships, scholarships for disabled students, etc.).

Students are usually required to meet minimum academic standards to remain eligible for the scholarship.

**Application Process: Documentation:**

Required documents may include proof of enrollment, academic records, income certificate, identity proof, and sometimes, additional documents based on specific scholarship requirements.

**Selection Process:**

Once applications are received, they are typically reviewed by a selection committee or a designated authority. The selection process may consider factors like academic merit, financial need, and any other specific criteria outlined by the scholarship program.

**Types of Scholarships:**

Scholarships can vary widely in terms of their focus. Some may be based on merit, while others may be need-based or targeted towards specific groups such as minorities, women, or students pursuing specific fields of study (e.g., arts, sports, etc.).

**Duration and Renewal:**

Scholarships may cover a specific duration, such as one academic year, or may be renewable for multiple years based on the recipient's academic performance and adherence to other specified criteria.

**Scholarship Amount:**

The amount of the scholarship can vary greatly depending on the specific program, level of education, and the financial resources available. It may cover tuition fees, living expenses, books, and other educational costs.

**Disbursement of Funds:**

Scholarships may provide funds directly to the student or may be disbursed through the educational institution.

**Compliance and Reporting:**

Recipients of government scholarships may be required to comply with certain conditions, such as maintaining a minimum GPA, attending classes regularly, and providing periodic progress reports.

**Post-Graduation Obligations:**

Some scholarships may have post-graduation obligations, such as a commitment to work in a specific field or region for a certain period after graduation.

**Monitoring and Evaluation:**

Government bodies often monitor and evaluate the effectiveness of scholarship programs to ensure that they are achieving their intended goals and reaching the target demographic.

Students are required to apply for these scholarships through a specified application process. This may involve filling out forms, providing necessary documentation, and sometimes, writing essays or providing recommendations

CO-ORDINATOR
INTERNAL QUALITY ASSURANCE CELL
M.G.V.'s Arts, Science & Commerce College
Manmad, Dist. Nashik

SENIOR UNIT (Arts, Science & Comm. College, Manmad)

PRINCIPAL
MGV's Arts, Science & Commerce College
MANMAD, Dist. Nashik

Manmad, Dist. Nashik - 423 104

Phone : 02591 - 222342, 226650 Fax : 02591 - 222342 Email : manmad_college@rediffmail.com

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व
विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे सन २०१८-१९
ते २०२१-२२ या कालावधीतील शिष्यवृत्ती / फ्रिशीप
योजनेंतर्गत प्रलंबित अर्ज निकाली काढण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२३/प्र.क्र.११/शिक्षण-१
नवीन प्रशासन भवन, १९१, जे. टाटा रोड, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०
दिनांक : २४ मे, २०२३.

वाचा- १ शासन निर्णय क्र.साप्रवि-मातंस-२०१८/प्र.क्र.१३८/से-१/३९, दि.१२.१०.२०१८
२ शासन परिपत्रक क्र.इबीसी-२०१७/प्र.क्र.७३/शिक्षण, दिनांक २४ मे, २०१९
३ शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.४२/शिक्षण दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९.

प्रस्तावना:-

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान), दिनांक १२.१०.२०१८ अन्वये शासनाच्या विविध विभागांकडून देण्यात येणारे लाभ, आर्थिक सहाय्य आणि सेवा यांचे उद्देशीय व पात्र लाभार्थ्यांना वितरण करण्यासाठी थेट लाभ हस्तांतरण (महाडिबीटी) प्रणाली ही एकमेव राज्यस्तरीय प्रणाली लागू करण्यात आली आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून इतर मागासवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागासप्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व व मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात. विभागाच्या दिनांक २६.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये शिष्यवृत्ती योजनांसंदर्भातील अर्ज करण्यापासून योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रियेसाठी राज्यस्तरीय डीबीटी प्रणालीचा वापर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. महाडीबीटी पोर्टलद्वारे मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांचा लाभ थेट विद्यार्थ्यांना देण्यात येतो.

सन २०१८-१९ पासून महाडिबीटी प्रणालीमार्फत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असली तरी पोर्टलवर अर्ज करताना येणाऱ्या विविध अडचणींमुळे अनेक विद्यार्थ्यांचे विहित मुदतीत अर्ज भरता न येणे, अर्ज Auto Reject होणे, एखाद्या वर्षी अर्ज भरता न आल्यास त्या वर्षी Gap Year असे पोर्टलवर नमूद होऊन पुढच्या वर्षीचा अर्ज भरण्यास अडचण येणे अशा बऱ्याच अडचणींचा सामना विद्यार्थ्यांना करावा लागत आहे त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देता येत नाही. या सर्व अडचणींचा विचार करता, सन २०१८-१९ पासून सन २०२१-२२ पर्यंत ज्या विद्यार्थ्यांना अशा अडचणी आल्या आहेत, अशा प्रकरणी निर्णय घेण्यास हा विभाग सक्षम असल्याचे माहिती व तंत्रज्ञान विभागाने अभिप्राय दिले आहेत. यास्तव विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे सन २०१८-१९ ते २०२१-२२ या कालावधीतील शिष्यवृत्ती / फ्रिशीप व ...

PRINCIPAL
MGV's Arts, Science & Commerce College
MANMAD, Dist. Nashik

प्रलंबित अर्ज निकाली काढण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यपद्धती लागू करण्याची बाब शासनाचा विचाराधीन होती.

शासन निर्णय-

सन २०१८-१९ पासून सन २०२१-२२ या वर्षात ज्या विद्यार्थ्यांना महाडिबीटी प्रणालीवर फॉर्म भरण्यास अडचणी आल्या आहेत, अशा विद्यार्थ्यांना खालील अटि व शर्तींच्या अधीन राहून ऑफलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

१) ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीकरिता अर्ज करताना आधार नोंदणी न केल्याने महाडिबीटी प्रणालीवर अर्ज नामंजूर (Auto Reject) झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या आधार प्रमाणपत्र सादर करुन ऑफलाईन अर्ज करता येईल.

२) ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर केला होता परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे महाडिबीटी प्रणालीवर सिस्टीम ॲडमीन कडून अर्ज नामंजूर (Reject) झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना ऑफलाईन अर्ज सादर करता येईल, तथापि, कोणत्या कारणामुळे ऑनलाईन अर्ज रिजेक्ट झाला त्याची कारणमीमांसा व त्याबाबतच्या पूर्ततेसह ऑफलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

३) ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज केला आहे व सद्यःस्थितीमध्ये निधी अभावी त्यांच्या खात्यामध्ये शिष्यवृत्ती जमा झालेली नाही, अशा विद्यार्थ्यांना ऑफलाईन अर्ज सादर करता येणार नाहीत.

४) सदर ऑफलाईन अर्ज सादर करताना महाडिबीटी प्रणालीवरील नामंजूर झालेल्या अर्जाचा क्रमांक (Application ID) नमूद करणे आवश्यक आहे. सदर Application ID नमूद नसेल अशा अर्जांचा शिष्यवृत्ती मंजूरीकरिता विचार करण्यात येणार नाही.

५) ज्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन फॉर्म शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निकषांमध्ये बसत नसल्यामुळे (उदा. उत्पन्न मर्यादा, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र इ.) नामंजूर (Reject) झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना ऑफलाईन अर्ज सादर करता येणार नाहीत.

६) जे विद्यार्थी काही विशिष्ट कारणामुळे (महाविद्यालय बदल, शिक्षणात खंड इ.) महाडिबीटी प्रणालीवर अर्जाची नोंदणी करु शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना कारणमीमांसासह ऑफलाईन अर्ज सादर करता येतील. तथापि, सदर प्रकरणी विद्यार्थ्यांनी नमूद केलेली कारणमीमांसा समर्पक असल्यासच शिष्यवृत्ती देय ठरणार आहे व याबाबतचा अंतिम निर्णय शासनाचा असणार आहे.

७) सदर ऑफलाईन अर्ज सादर करताना महाडिबीटी प्रणालीवर लागू असलेले सर्व निकष संबंधित विद्यार्थ्यांना लागू राहतील. त्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे नोंदविणे आवश्यक राहील (उदा. उत्पन्न मर्यादा, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र, वैध राहिवास प्रमाणपत्र इ.).

८) ज्या कोर्सचे मॅपिंग शिष्यवृत्तीसाठी महाडिबीटी प्रणालीवर आहेत, अश्याच कोर्सचे शिष्यवृत्ती ऑफलाईन अर्जासाठी लागू राहील. महाडिबीटी प्रणालीवरील मॅपिंग न झालेल्या कोर्सची शिष्यवृत्ती ऑफलाईन पध्दतीने सादर झाल्यास अश्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

९) एकच विद्यार्थ्याचे ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज सादर होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी तसेच याप्रकरणी ऑनलाईन अर्ज भरताना स्वत:चे प्रतिज्ञापत्र संबंधित विद्यार्थ्यांने द्यावे. सदर प्रकरणी दोन्ही प्रकारात विद्यार्थ्याने अर्ज सादर केलेला असल्याची बाब निष्पण झाल्यास संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्यात येईल.

१०) सन २०१८-१९ पासून सन २०२१-२२ या वर्षात ज्या विद्यार्थ्यांना महाडिबीटी प्रणालीवर फॉर्म भरण्यास अडचणी आल्या आहेत, अशा विद्यार्थ्यांनी ऑफलाईन अर्ज सादर करुन त्यांना शिष्यवृत्ती देण्यामागे केवळ होतकरु व गुणवंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये असा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे उपरोक्तप्रमाणे विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामार्फत संबंधित सहाय्यक आयुक्त/सहाय्यक संचालक, यांचेकडे शिष्यवृत्तीकरिता ऑफलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी - <u>दि.२५.०५.२०२३ ते दि. २४.०६.२०२३ इतका असेल.</u>

११) दि.२४.०६.२०२३ नंतर येणाऱ्या कोणत्याही अर्जांना शासनाकडून मंजूरी देण्यात येणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१२) संबंधित सहाय्यक आयुक्त/ सहाय्यक संचालक यांनी फॉर्मची तपासणी करुन आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव शासनास सादर करण्याचा कालावधी :- दि.२५.६.२०२३ ते १५.०७.२०२३

१३) महाईस्कॉल प्रणालीवरील नोंदणी झालेले प्रलंबित तसेच सन २०११-१२ ते सन २०१७-१८ या वर्षातील ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात आलेले शिष्यवृत्ती / फ्रिशीप अर्ज निकाली काढण्यासाठी विभागाकडून वेळोवेळी परिपत्रक/ शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्या सर्व सूचना सदर प्रकरणीही लागू राहतील.

PRINCIPAL
Arts, Science & Commerce College
MANMAD, Dist. Nashik

पान ५ पैकी ३

त्याचबरोबर केंद्र शासनाच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील शिष्यवृत्तीच्या वितरण प्रणालीस देखील मान्यता देवून ती स्विकारण्यात आलेली आहे.

३. सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांनी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीकरिता माहे मार्च, २०२१ पासून सुधारीत मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या आहेत सदर मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती

शासन निर्णय -

उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांनी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीकरिता माहे मार्च, २०२१ पासून जारी केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचना, सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमुद ठळक मुद्यांसह राज्यात लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरहू योजनेसाठी येणारा खर्च मागणी क्र. एन-३ (०४) शिष्यवृत्ती आणि विद्यावेतने, (०४) (१६) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, (केंद्पुरस्कृत १०० टक्के), (कार्यक्रम), ३४, शिष्यवृत्त्या/विद्यावेतने, (लेखाशीर्ष- २२२५ ०४९५) मागणी क्र एन-३(०४) शिष्यवृत्त्या आणि विद्यावेतने, (०४) (०१) भारत सरकारच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्त्या (कार्यक्रम) ३४, शिष्यवृत्त्या/विद्यावेतने लेखाशीर्ष ( २२२५ ०३५२) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात येऊन त्याखाली केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०७०७१७१७१६६७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SOMNATH
NAMDEO BAGUL

(सो.ना.बागुल)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२. अपर मुख्य सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४. मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.



PRINCIPAL
VGV's Arts, Science & Commerce College
MANMAD, Dist. Nashik